# प्रकरण ३) साहित्याची सामाजिकता आणि भाषा

## घटक १ - साहित्य आणि समाज – जीवनमूल्ये आणि साहित्यमूल्ये, साहित्य वाचनाची प्रक्रिया आणि आवश्यकता

## घटक २ - साहित्याची भाषा : भाषेच्या त्रिविध शक्ती, अलंकारविचार, प्रतिमा, प्रतिक, प्राक्कथा, शैलीविचार – लेखक तशी शैली, साहित्यप्रकार तशी शैली, आशय तशी शैली

### १) साहित्य आणि समाज -

मराठी भाषेतील ‘साहित्य’ ही संकल्पना इंग्रजीतील ‘Literature’ या शब्दाला पर्यायी म्हणून उपयोजली गेली आहे. इंग्रजीतील ‘Literature’ या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ ‘कलामूल्य असलेले लेखनसाहित्य, विशिष्ट विषयावरचे वाङ्मय, माहिती देणारे छापील वाङ्मय’ असा आहे.

**साहित्य म्हणजे काय ? -**

मानवी जीवनव्यवहारविषयक चित्रण, अर्थनिर्णयन, भाष्य अशा स्वरूपाच्या भाषिक अभिव्यक्तीस स्थूलमानाने ‘साहित्य’ असे संबोधले जाते. जीवनव्यवहाराचे भावनिक, आध्यात्मिक, बौद्धिक अशा विविध अंगांनी घडविलेले सर्जनशील, वैचारिक, कल्पनात्मक, वास्तव अशा भिन्न-भिन्न स्तरांवरचे सर्वांगीण, सम्यक दर्शन साहित्यातून वाचकांस प्रतीत होते.

मराठीमध्ये साहित्याशिवाय मोठ्या प्रमाणात प्रचलित असलेली दुसरी संकल्पना म्हणजे वाङ्मय. आता वाङ्मयाचा अर्थ वाक, वाणीमय असा आहे; परंतु जे - जे वाणीयुक्त आहे ते सर्वच वाङ्मय असे म्हणता येत नाही. त्याप्रमाणे जे – जे लिहिले जाते, त्या लिखित साहित्यालाही साहित्य म्हणता येणार नाही. संस्कृत परंपरेमध्ये साहित्याचा शब्दप्रयोग इसवी सन ९०० च्या सुमारास केला गेला.

साहित्य हे शब्दार्थाने बनलेले असते. शब्द म्हणजे ध्वनी वा अक्षरसमूह किंवा वर्णसमूह असा विस्तार होऊन, अशा अनेक शब्दसमूहांचे बनणारे वाक्य, वाक्यसमूहातून व्यक्त होणारा आशय असा व्यापक अर्थ शब्द या संज्ञेत सामावलेला आहे. संवेदनांची, विचारांची, कल्पनांचे संघटना असाही अर्थ ही संज्ञा वापरताना अभिप्रेत असतो. अशा व्यापक अर्थाने शब्द व अर्थ यांचे सहितत्त्व हे साहित्याचे मुख्य लक्षण ठरते. सर्व लिखित मजकूर म्हणजे साहित्य ही व्याख्या जरी काही तज्ज्ञांनी केली असली

तरी वाङ्मय हा शब्द अधिक व्यापक अर्थाने वापरावा; असे काही समीक्षकांनी सुचविले आहे साहित्य ही संज्ञा अर्थदृष्ट्या सारस्वत, विदग्ध वाङ्मय या संज्ञांच्या जवळ जाणारी आहे. विदग्ध वाङ्मय म्हणजे अभिजात वाङ्मय. चतुर, कलापूर्ण, नागर, सुसंस्कृत असे विविध अर्थ विदग्ध या संज्ञेने सुचविले जातात कलात्मकते बरोबरच उच्च अभिरुची निदर्शक अशी ही संज्ञा आहे.

**समाज म्हणजे काय?**

एकोणिसाव्या शतकात समाजाच्या समाजशास्त्रीय अध्ययनाची एक मोठी परंपरा निर्माण झाली, तसेच समाजविषयक वस्तुनिष्ठ अध्ययन करणारी समाजशास्त्र ही स्वतंत्र विद्याशाखाही अस्तित्वात आली. त्यामध्ये हर्बर्ट स्पेन्सर, मॅक्सवेपर, कार्ल मार्क्स, एंजल्स या सर्वच समाजशास्त्रज्ञांचा महत्त्वाचा वाटा आहे.

समाज म्हणजे सामाजिक संबंधांचे जाळेहोय, असे मॅक आयव्हर यांनी म्हटले, तर समान सवयी, कल्पना व अभिवृत्ती असणाऱ्या म्हणजेच समान सामाजिक व सांस्कृतिक आशय असणाऱ्या आणि विविध प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या समूहाला समाज म्हणतात. असे डॉ. किंबाल यंग यांनी ही व्याख्या केली आहे.

साहित्याचा समाजाशी संबंध आहे की नाही ? असावा की नाही ? साहित्य हे व्यक्तिसापेक्ष असावे की समाजसापेक्ष ? असे वाद यापूर्वी अनेकदा झाले. या संदर्भात नामवंत लेखकांनी समाजासमोर आपापली बाजू मांडली आहे पण जे साहित्य समाजाला कार्यप्रवृत्त करीत नाही, विचाराला चालना देत नाही, वैचारिक परिवर्तन घडवत नाही, ते साहित्य कितीही मोठे असले तरी साहित्याने समाजाशी गुणाकारच केला पाहिजे, ही भूमिका आजपर्यंत अनेक नामवंतांनी मांडली आहे साहित्यिक समाजाचे देणे लागतो. समाजात होणारे बदल, नवीन प्रयोग, नवीन स्वप्न, त्याचे होणारे परिणाम हे सगळे साहित्यिकांनी टिपले पाहिजे, बोलले पाहिजेत आणि परिणामकारकरीत्या लोकांसमोर मांडले पाहिजेत

माणसाची व्याख्या करताना तो समाजशील प्राणी आहे, अशी केली जाते. माणूस समाजात जन्मतो, वाढतो, मृत्यू पावतो त्यामुळे समाजात जगत असताना तेथील भल्याबुऱ्या अनुभवांचा त्याच्यावर परिणाम होत असतो. साहित्यात या सामाजिक अनुभवांचे चित्रण त्यामुळे येणे स्वाभाविक आहे. गो. ब. देवलांचे 'शारदा' हे नाटक सामाजिक होते. कारण, त्यात बाला-जरठ विवाहाचे चित्रण आढळते. राम गणेश गडकरी यांचे 'एकच प्याला' हे नाटक दारूच्या दुष्परिणामाचे जेव्हा चित्रण करते, तेव्हा ते सामाजिक नाटक ठरते.

साहित्य आणि समाज यांच्या अनुबंधाची चर्चा तीन अंगाने करता येऊ शकते

१) साहित्याची निर्मिती विशिष्ट स्थलकालात, सामाजिक, संस्कृतीत आणि वाङ्मयीन वातावरणात होत असल्याने साहित्याचा समाज आणि संस्कृतीशी संबंध येतो.

२) साहित्यात सामाजिक स्थिती गती, वास्तव, विचारप्रणाली, मूल्यव्यवस्था यांचे चित्रण केले जाते.

३) साहित्य हे वाचकांच्या माध्यमातून समाजमनावर काहीएक संस्कार करते. हा परिणाम सौंदर्यात्मक, वाङ्मयीन, सामाजिक आणि वैचारिक स्वरूपाचा असतो. या अंगाने साहित्य हे सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत सहभागी होत असते.

साहित्यविचार आणि समाजचिंतन या ग्रंथातप्रा. स. शी. भावे यांनी लिहिले आहे की, 'साहित्य म्हणजे भाषेच्या माध्यमाने केलेली कलानिर्मिती; साहित्यिक म्हणजे कला निर्मितीची क्षमता असलेली व कलानिर्मिती करणारी व्यक्ती आणि समाज म्हणजे पारंपरिक व नव्याने निर्माण होणाऱ्या हितसंबंधाच्या संदर्भात एकत्र आलेला व एकत्र राहणारा मानवसमूह.' असे म्हटले आहे. वेलेक आणि वॉरेन यांनीही साहित्य आणि समाज या दोहोतील संबंधाचा मोठ्या विस्ताराने शोध घेतला आहे. साहित्य आणि समाज यातील निकट संबंधाचा वस्तुनिष्ठ अभ्यास सर्वप्रथम फ्रान्समध्ये मादन स्तईल या विदुषीने केला तसेच कार्ल मार्क्स आणि तेन, कांट, बोनाल्ड, कोलरीज इत्यादी पाशात्य साहित्य संशोधकांनी आपली मते मांडली आहेत.

## २) साहित्य आणि समाज यातील परस्पर संबंध-

रा. ग. जाधव म्हणतात, 'साहित्याची निर्मिती हस्तिदंती मनोऱ्यात किंवा समाज व्यवहारापासून दूर असलेल्या पोकळीत होत नाही आणि तशी ती झाली तरी या प्रकारचे साहित्य श्रेष्ठ दर्जाचे ठरत नाही वाङ्मयीन निर्मितीची पाळेमुळे समाजव्यवस्थेचे रुजलेली असतात. लेखकाचा साहित्यिक पिंड घडवण्याला तत्कालीन सामाजिक परिस्थिती, त्या काळात प्रभावी असलेली विचारप्रणाली आणि त्या विशिष्ट भाषेतील वाङ्मयीन व शैलीविषयक परंपरा मोठ्या प्रमाणात कारणीभूत असतात. साहित्यकृती ही प्रतिभेची निर्मिती असते आणि स्वतःची वैशिष्टे पूर्णतः ती जपत असते, हे खरे आहे. पण, याच वेळी ज्या काळात आणि ज्या परिस्थितीत ती निर्माण होते, त्या परिस्थितीचा प्रभावमर्यादा ही पूर्णपणे ओलांडू शकत नाही.'

रा. ग. जाधव यांचे मत साहित्य आणि समाज यात परस्परसंबंध आहे, हेच आपल्यासमोर स्पष्ट करते. कविता, कथा, कादंबरी आपण वाचतो म्हणजे मनाने आपण त्यातील जगणे जगत असतो लेखक एक व्यक्ती म्हणून कोणत्यातरी समाज गटात वाढत असते. या समाजगटाच्या जीवनपद्धतीतील

अनेक घटकांनी त्याच्या मनाचे पोषण होत असते. त्याच्या जडणघडणीमध्ये समाजगटाच्या जीवनपद्धतीचा संदर्भ असतो. त्यामुळेच तो त्याच्या साहित्यात व्यक्त होणे स्वाभाविक आहे. समाजातील एक व्यक्ती म्हणूनच नव्हे; तर एक कलावंत म्हणूनही व्यक्तीच्या जडणघडणीला सामाजिकतेचा व्यापक संदर्भ असतो. लेखक ज्या समाजात वाढतो, त्या समाजाची जीवनपद्धती त्याच्या कलात्मक अनुभवाचे संदर्भक्षेत्र ठरत असते. साहित्यात येणारे विषय, मानवी जीवनविषयक प्रश्न, मानवी जीवनाविषयीच्या श्रेयकल्पना, नीतिमूल्य त्या संदर्भ क्षेत्राशी, म्हणजे त्या समाजाच्या पद्धतीशी निगडित असतात. 'साहित्य म्हणजे लेखकाची भोवतालच्या वास्तवाविषयीची प्रतिक्रिया असते.' लेखकाची सामाजिक जाणीव ही साहित्यातून व्यक्त होत असते.

### ३) साहित्यमूल्ये आणि जीवनमूल्ये –

कला आणि साहित्य यांची म्हणून मानली जाणारी काही मूल्ये आणि प्रत्यक्षात जगले जाणारे जे मानवी जीवन, त्याचे म्हणून मानली जाणारी काही मूल्य असे दोन गट खूप जुन्या काळापासून कल्पिले गेलेले दिसतात. कला किंवा साहित्य आणि समाजजीवन यांच्या परस्पर संबंधांची चर्चा करताना या दोघांचा विचार केला गेलेला दिसतो

रा. भा. पाटणकर यांनी आपल्या 'सौंदर्यमीमांसा' या ग्रंथात 'कलेची द्विध्रुवात्मकता' सिद्धांत मांडला आहे. पहिला कलेच्या किंवा सौंदर्याच्या व्यवहारात लौकिक जीवनाचे स्थान आहे असे मानतो, तर दुसरा त्याला जीवन निरपेक्ष असेच स्वायत्त अस्तित्व आहे, असे मानतो. म्हणजेच पहिला सिद्धांत जीवन किंवा जीवनमूल्य मानतो आणि दुसरा सिद्धांत कला वादाचा पुरस्कार करतो. यातूनच पुढे कलामूल्यांना मान्यता देणारा कलावादी संप्रदाय, जीवनमूल्यांना मान्यता देणारा तो जीवनवादी संप्रदाय, असे दोन संप्रदाय रूढ झाले. कलाकृती म्हणजे अनेक घटकांची एकत्र सांधलेली घटना किंवा संघटना होय. त्यातील घटकांच्या परस्परसंबंधातून कलाकृतीचा घाट संभवतो; हे ध्यानात घेऊन सुसंवाद, प्रमाणबद्धता, औचित्य, सूचकता, नाविन्य, अनेकार्थता अशी अनेक कलामूल्य मांडली गेली आहेत. कलाकृतीच्या संदर्भात या साऱ्या कलामूल्यांचा जीवनाच्या अंगाने नव्हे; तर केवळ कलेच्या अंगाने विचार केला जावा, असा कलावाद यांचा आग्रह आहे.

जीवनमूल्यांचा आग्रह धरणाऱ्या जीवनवादी भूमिकेच्या मते, साहित्यकृती ही एका व्यक्तीमनाची निर्मिती असली, तरी कलावादी म्हणतात इतकी ती स्वतंत्र नाही. प्रत्येक व्यक्तीचे म्हणून काही वेगळे पिंडधर्म असतात. दिलेल्या वैशिष्ट्यापेक्षा ही वैशिष्ट्य कमीही असतात. मराठी साहित्याचा विचार करीता एका काळातील लेखक, कवी, नाटककार यांच्या लेखनात जो वेगळेपणा दिसतो तो अशा पिंडधर्मामुळे.

केशवसुत, गोविंदाग्रज, रेंदाळकर, बी हे सारेच कवी आगरकरी सुधारणांबद्दल अनुकूल सूर लावणारे असले, तरी अशा पिंडधर्मातील वेगळेपणामुळे त्यांची कविताही वेगळी झाली. त्यामुळे आपोआपच साहित्यातील समाजजीवनविषयक जाणिवांचे मोल वाढते.

'कलाकृती चांगली व श्रेष्ठ' या लेखात प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी कलामूल्यांची मजल कलाकृतीचे 'चांगलेपण' सिद्ध करण्यापर्यंत जाते, तर जीवनमूल्यांची पूर्ती तिचे 'श्रेष्ठपण' नक्की करते, अशा अर्थाची मांडणी केली आहे. तेव्हा केवळ कलागुणांनीयुक्त अशा साहित्यकृती (उदा. ना. सी. फडके यांच्या कादंबऱ्या) चांगल्या ठरू शकतील. पण 'श्रेष्ठ' नव्हे. या उलट हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांना आपणश्रेष्ठ म्हणतो, ते त्यातील सखोल व सर्वस्पर्शी अशा जीवनाच्या चित्रणामुळे होय.

डॉ ग्रामोपाध्ये लिहितात, 'जीवनाच्या अंतिम मूल्यांचा साक्षात्कार होत असल्याने(वाङ्मयाचे) मूल्यमापन रूढ, व्यावहारिक आणि म्हणून बदलणाऱ्या सामाजिक मूल्यांनी करू नये, तर जीवनाच्या शाश्वत आणि अंतिम मूल्यांनी करावे' असे जिथे होते तिथे स्वतंत्र मानली जाणारी साहित्यमूल्ये व्यापक अशा जीवनमूल्यात विलीन झाली असल्याचा अनुभव येतो आणि उच्चतर आनंदाबरोबरच मानवी अस्तित्वाबद्दलच्या सहनुभावांचीप्राप्ती होते.

असा अनुभव फक्त रामायण, महाभारतासारख्या काव्याबाबतच येतो का ? तर तसे नाही. ही निर्मिती प्रक्रियेतील अत्युच्च शिखरे झाली. ज्या ठिकाणी लेखक किंवा कवी आपल्या अनुभवाद्वारा स्थलकालाच्या चौकटी ओलांडून तिथे कमीअधिक प्रमाणात प्रेयसाचा नव्हे; तर श्रेयसाचा वेध घेण्याच्या प्रयत्नात असतो, तिथे कमी अधिकपणे साहित्यमूल्ये आणि जीवनमूल्ये एकवटल्याचा अनुभव येतो. मराठीत हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्या किंवा केशवसुतांच्या कविता असा अनुभव देतात.

मराठी साहित्याच्या वाटचालीत ना. सी. फडके आणि वि. स. खांडेकर यांचा काळ म्हणजे या दोन मूल्यगटातील संघर्षाचा काळ समजला जातो. फडके कलावादाचे, तर खांडेकर जीवनवादाचे खंदे पुरस्कर्ते म्हणून नोंदवले गेले आहेत तेव्हा साहित्यमूल्ये आणि जीवनमूल्ये यांच्यात स्वभावतः काही विरोध आहे, असे समजण्याचे कारण नाही. साहित्यकृती यशस्वी होण्याच्या दृष्टीने या दोघांची उपस्थिती आवश्यक असते. वास्तविक, साहित्यकृती या नाण्याच्या, कलामूल्ये आणि जीवनमूल्ये या दोन बाजू होत. ह्या नाण्याचे मूल्य या दोन बाजूंवर अवलंबून असते

## ४) साहित्य वाचनाची प्रक्रिया आणि आवश्यकता

आपण वाचतो ते का आणि कशासाठी ? त्याचे महत्त्व काय ? हे समजले की वाचनाचे फायदेही होतील. 'सुजान वाचकत्व' ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे वाचन हे एका रात्रीत जन्माला येणारी गोष्ट नाही. त्यासाठी अनुभव व प्रयत्न या दोहोंची सांगड घालावी लागते

वाचनातून मिळणारा आनंद हा निर्भेळ उपयुक्ततेपलीकडचा ब्रह्मानंदसहोदर असतो. वाचनच असा आनंद देऊ शकते वाचनाने मन तर रमतेच. पण, ते बहुश्रुत होते. जीवनाचे विविध पैलू दिसतात. अनेक नवे विचार परिचित होतात. अनेक लेखक, त्यांची लेखनशैली, जीवनदृष्टी, शब्दयोजना माहिती होतात आणि वाचकाच्या व्यक्तिमत्वाला एक छानसा आकार प्राप्त होतो. वाचन ही केवळ शब्दक्रिया नाही, तर विचारप्रक्रिया आहे; हे समजून घ्यायला हवे

### वाचन म्हणजे काय ? –

वाचन म्हणजे लिहिणाऱ्याच्या हेतूनुसार, वाचणाऱ्याच्या तयारीप्रमाणे होणारे अर्थाचे आकलन होय. आकलनाबरोबर उद्दिष्टनुरुप कृतीची प्रेरणा होणे म्हणजे वाचन

पूर्वी पाठांतर म्हणजे वाचन म्हटले जायचे. आता वाचनाची, आकलनाची (Comprehension) पूर्वअट असते. समजून घेऊन वाचणे महत्त्वाचे. केवळ अस्खलित उच्चारण हा अभिनय, अभिव्यक्ती वा अभिवाचन या अंगाने ते प्रकट आविष्करण ठरते

वाचनाचे स्वरूप व व्याप्ती समजून घ्यायची तर तिच्या अनेकानेक व्याख्या, परिभाषा समजून घेणे आवश्यकच नाही; तर अनिवार्य होऊन जाते. आपण त्यासाठी काही व्याख्यांचा परामर्श घेऊ.

१) लिखित मजकुराचे मुक व प्रकट उच्चारण म्हणजे वाचन होय. वाचन हे समजून घेऊन अथवा न समजता ही होते. लहानपणी मुले वर्ण, अक्षरे वाजतात खरे; पण ते त्यांना समजतेच असे नाही. उच्चारण, पाठांतर, समजणे, आकलन या वाचनाच्या भिन्न प्रक्रिया होत.

२) वाचन हे लिखित मजकुराच्या अर्थाचा संभ्रम दूर करण्याची प्रक्रियाव पद्धती.

### साहित्य वाचनाची प्रक्रिया आणि आवश्यकता –

खरेतर वाचन हे परीक्षेसाठी नसते. अक्षर समजणे व ते वाचता येणे, हा कौशल्याचा एक भाग आहे. पण, वाचलेल्या गोष्टीमुळे ज्ञान मिळणे, त्यामुळे विचार प्रवृत्त होणे, चिंतनशीलतेकडे झुकणे इत्यादी गोष्टी जेव्हा घडतात, तेव्हा वाचन प्रक्रिया पूर्णत्वाला पोहोचते व हेच वाचक समाजात वैचारिक चळवळ घडवू शकतात. असे वाचक स्वतः वाचलेले आणि त्यानंतर काही सुचलेले विचार समाजापुढे

वैशिष्ट्यपूर्ण शैलीत मांडतात. त्यातूनच पुढे सामाजिक उत्थानाची प्रक्रिया सुरू होते आशयसंपन्न पुस्तकांनी वाचत घडतो, तसेच या घडलेल्या वाचकांकडून दुसरी
आशयसंपन्न साहित्यनिर्मितीदेखील होते, म्हणजे या क्रिया परस्परपूरक आहेत

वाचकांचे खालील प्रकार असतात-

१) परीक्षेसाठी वाचन करणारा वाचक

२) मनोरंजनपर वाचन करणारा वाचक

३) शिकणे व शिकवण्यासाठी वाचन करणारा वाचक

४) दैवी उपासनेसाठी वाचन करणारा वाचन

५) चिंतनशील वाचक

थोडक्यात, वाचन प्रक्रियेच्या प्रमुख पायऱ्या म्हणजे अक्षरे, शब्द, वाक्य, त्याचा उच्चार, त्याचे आकलन, अर्थ समजून घेणे व त्यावर स्वतःच्या बुद्धीनुसार क्रिया प्रतिक्रिया व्यक्त करणे व जे काही त्यातून बोध होईल, त्यानुसार वर्तनात बदल करणे.

विद्यार्थ्यांची स्वतःची विचारशक्ती व शिक्षकाने त्याची जागृत केलेली चिकित्सक वृत्ती या दोघांचा योग्य संगम घडला की वाचक घडण्याची प्रक्रिया योग्य दिशेने सुरू होते.

वाचनावर काहीसे प्रभुत्व आल्यानंतर लिखित शब्द आणि अर्थ या दोन्हींच्या मधल्या दुव्याचे, उच्चारित शब्दांचे प्रयोजन संपून जाते आणि प्रवास भरभर होऊ लागतो. लिखित शब्द समोर दिसताक्षणी संलग्न अर्थ आपल्या मनात उमटतो. प्रथम शब्द भरभर वाचता येतात. मग सोप्या वाक्यातल्या शब्दांचे अर्थ जुळविता येतात त्यानंतर गुंतागुंतीची वाक्य, समग्र परिच्छेदाचे आकलन, लेखाचे आकलन, एकूण पुस्तकाचे आकलन, अशी क्रमाक्रमाने व्याप्ती वाढत जाते.

साहित्य वाचन प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा घटक गुणवत्तापूर्ण वाचन महत्त्वाचे असते

१. वाचकाचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य.
२. त्याच्या आवडीचे विषय.
३. त्याची बुद्धिमत्ता व संवेदनशीलता
४. त्याचे अनुभव समजून घेण्याची प्रगल्भता
५. पुरेशी एकाग्रता.
६. त्याचा भावनिक विकास.
७. वाचनासाठी वेळ मिळेल तेव्हा तत्पर असणे.

८. विषयाचे आणि भाषेचे पूर्वज्ञान आणि

९. वाचन यामागचे उद्दिष्ट किंवा हेतू

लेखक आपल्या कल्पनेच्या जोरावर प्रतिसृष्टी निर्माण करीत असतो, विचारांचे नवीन नवीन अनुबंध मांडत असतो आपल्या वाचनकौशल्याच्या जोरावर ती प्रतिसृष्टी, कल्पनाविश्व पुन्हा निर्माण करीत असतो. विचारांचे अनुबंधउलगडत असतो. म्हणून वाचन ही एक सर्जनशील कला आहे. चिरंतन मूल्यांचा वारसा जपणारे दर्जेदार अभिजात साहित्य कोणते आणि पोकळ विचारांचे सवंग स्थळ साहित्य कोणते ? त्याची पारख करण्याची जबाबदारी वाचन प्रक्रियेत घडत असते. अशी पारख करता येण्यासाठीच वस्तुनिष्ठ, तर्काधिष्ठित, शास्त्रीय विचारसरणीची गरज असते. म्हणूनच चिकित्साप्रधान वाचन हे उच्च पातळीचे वाचनकौशल्य अवगत करणे महत्त्वाचे.

साहित्य वाचनात अगणित व्यक्तिगत फायदे व सामाजिक फायदे दडलेले असतात. वाचनाची सवय होणे यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतात. सवय लागल्यानंतर अधिक आशयपूर्ण, अर्थपूर्ण वाचनाकडे वळता येते. चिकित्सक विचार करण्याची पात्रता येण्यासाठी एकूण साहित्यिक वाचन दांडगे असावे लागते. उघड्या डोळ्यांनी जगाचा अनुभव घेण्याची संवेदनशीलता असावीलागते. व्यापक दृष्टिकोन, अनुभव आणि चिंतनशील वृत्ती यांचा विकास होण्यासाठी साहित्य वाचनाची प्रक्रिया आणि आवश्यकता समजून घेणे महत्वाचे ठरते

**समारोप** –

वाचन प्रक्रियेतून ज्ञानाचे क्षितिज रूंदावत असते तुम्ही जेव्हा त्याचा मतितार्थ, लक्षार्थ, व्यंगार्थ, ध्वनार्थ लावणे सर्वस्वी वाचकाच्या वकुबावर अवलंबून असते श्रेष्ठ साहित्य एकाच मजकुरातून प्रत्येक वाचकास भिन्न अर्थ, बिंब, भाव देते. कारण, वाचन प्रक्रिया ही प्रत्येकाच्या आकलनावर अवलंबून असते. त्यामुळेच एक कविता, नाटक, कथा, कादंबरी वेगवेगळ्या वाचकांनावेगवेगळी अनुभूती देत असते. परिणामी वाचन प्रक्रियेतून वाचकाचे रूपांतरसर्जकांत केव्हा होते, हे कळतदेखील नाही. वाचन प्रक्रियेतून मुद्रित आशयाचा होणारा विकास अनपेक्षितपणे नवनिर्मिती करणारा असतो त्यासाठी वाचक आपल्या जाणिवातील विविध क्लुप्त्या, युक्त्या वापरत असतो. ‘जो न देखे रवि, वह देखे कवि’ असे म्हटले जाते. त्याचा हाच अर्थ असतो. हीच वाचन प्रक्रियेची खरी फलश्रुती असते. वाचक यासाठी पूर्वी आत्मसात केलेली कौशल्ये, शब्द, शैली, अर्थ, जाणिवा, बोध या सर्वांचा लीलया वापर करून हा चमत्कार घडवून आणतो. वाचनाने ब्रह्मानंदी समाधी लागते; त्यासाठी मात्र वाचन संस्कार हवा.

संस्कारातूनच संस्कृतीचा विकास घडत असतो वाचन प्रक्रियेत तुम्ही जेवढे डुंबाल, बुडाल तेवढा तुम्हाला आनंद मिळणार

-----------------------------------------------------------------------------------------------

## घटक २ - साहित्याची भाषा : भाषेच्या त्रिविध शक्ती, अलंकारविचार, प्रतिमा, प्रतिक, प्राक्कथा, शैलीविचार – लेखक तशी शैली, साहित्यप्रकार तशी शैली, आशय तशी शैली

### साहित्याची भाषा –

**साहित्याची भाषा म्हणजे व्यक्तिमनाचा आविष्कार असतो.** 'आज चांदणे उन्हात हसले तुझ्यामुळे' अशी काव्याची भाषा असते. साहित्याची भाषा मात्र व्यवहारात आपण कधी वापरत नाही, म्हणतही नाही. उदा. 'काढ सखे गळयातील तुझे चांदण्यांचे हात' असे नेहतीच्या व्यवहारात आपल्या प्रेयसिला कोणी म्हणत नाही.

**साहित्याची भाषा एकसंघ असते.** उदा. 'जरतारी हे वस्त्र माणसा तुझिया आयुष्याचे' या ओळीमधील 'माणसा' या शब्दाऐवजी 'मानवा' असा शब्द वापरला, तरी साहित्यकृतीचा तोल बिघडतो. कवीच्या अभिव्यक्तीला बाधा येते; इतकी ही भाषा अर्थपूर्ण असते. साहित्याची भाषा त्या त्या विषयाला अनुरूप असते. उदा. स्त्रीवादी साहित्याची भाषा, दलित – ग्रामीण – आदिवासी साहित्याची भाषा इ.

**साहित्यप्रकारांनुसारही साहित्याची भाषा बदलत जाते.** उदा. कथा, कादंबरी, कविता, नाटक या साहित्यप्रकारांची भाषा. याशिवाय एकच लेखक एकाच साहित्यप्रकारातून लिहित असला तरी त्याची भाषा त्या विषयानुसार वेगळी असते. उदा. वसंत कानेटकरांच्या भाषेचा ढंग सारखा असला तरी **प्रेमा तुझा रंग कसा** आणि **रायगडाला जेव्हा जाग येते** या त्यांच्या दोन नाटकातील भाषा विषयानुसार वेगळी असल्याचे दिसते.

**कवितेची भाषा स्पष्टीकरणात्मक, निवेदनात्मक व वर्णनपर असते.** उदा. 'फिटे अंधाराचे जाळे... झाले मोकळे आकाश' तर नाटकामध्ये संवाद आणि अभिनय यांना महत्त्व असल्याने त्यादृष्टीने भाषेचे उपयोजन केले जाते. उदा. 'प्रिये... पहा, रात्रीचा समय सरूनि येत उषःकाल हा'.

अशा प्रकारे साहित्याची भाषा ही व्याकरणापलीकडचे अर्थाधिक्य व्यक्त करते. तसेच तिच्या ठिकाणी अर्थव्यक्तीची समृद्धीही आढळते. निव्वळ संदेशवहनाचे कार्य ती करीत नाही. 'अनेकार्थता' हा तिचा खास विशेष असतो. अलंकारांनी ती सजलेली असते. साहित्याच्या भाषेतून व्यक्तिमनांची कसोटी घेतली जाते.

## २) शब्दार्थाचा वक्रव्यापर किंवा भाषेच्या त्रिविध शक्तींचा यथोचित परामर्श घ्या?

भाषेची शक्ती याचा अर्थ **शब्दाचे सामर्थ्य.** शब्दार्थाचे व्यापार, व्यवहार हे शब्दांच्या ठिकाणी असणाऱ्या त्रिविध शक्तींमुळे घडतात. या त्रिविध शक्ती म्हणजे **अभिधा, लक्षणा व व्यंजना** होय. या तीन प्रकारच्या अर्थव्यक्ती म्हणजे एक प्रकारची भाषेची तीन कार्येच होय. **अमिधा म्हणजे वाक्याचा सरळ अर्थ सांगणे. तर त्या वाक्यावरून दुसरा अर्थ सूचीत करणे याला लक्षणा म्हणतात. तर या दोन्हींपेक्षा तिसराच अर्थ सूचीत होणे याला व्यंजना असे म्हणतात.**

वास्तविक शब्द एकच असतो, त्याचा अर्थही एकच असतो. मात्र भिन्न भिन्न परिस्थितीत त्या शब्दाला **वेगचेगळे अर्थ प्राप्त होतात. उदा.** जर एखाद्या गाढवाला उद्देशून **'ते गाढव आहे'** असे म्हटले; तर त्याला वाच्यार्थ म्हणजे अमिधा म्हणतात. पण असेच जर **'गाढव' एखाद्या माणसाला म्हटले;** तर तेथे अर्थ बदलून 'मूर्ख मनुष्य' असा होईल. याला लक्ष्यार्थ म्हणजे लक्षणा म्हणतात. जर एखाद्या आईने आपल्या छोटया मुलाला उचलून घेतल्यावर ते बाळ हसले, तर ती आई त्याला लाडाले, कौतुकाने **'गाढवच आहेस'** असे म्हणाली तर तेथे वेगळाच अर्थ निर्माण होता; त्याला व्यंग्यार्थ किंवा व्यंजना असे म्हणतात. म्हणजे येथे 'गाढव' या एकाच शब्दाचे तीन वेगवेगळे अर्थ निर्माण होतात, यालाच शब्दार्थाचा वक्रव्यापर असे म्हणतात.

### १.अभिधाशक्ती – (मुख्यार्थ, वाच्यार्थ)

**एखादा शब्द उच्चारताना आपल्या मनाला तत्काळ एक विशिष्ट अर्थ जाणवून जातो.** उदा. 'झाड' म्हटल्याबरोबर एका विशिष्ट आकाराची वनस्पती किंवा 'वाघ' म्हटल्याबरोबर विशिष्ट आकाराचा एक हिंस्त्र पशू जाणवतो. या शब्दशक्तीला अमिधा असे म्हणतात. हा अर्थ शब्दांना संकेतांनी प्राप्त होतो. अर्थात कुठलाही शब्द घेतला, तरी त्याला लाभलेला अर्थ हा समाजाने मान्य केलेला असावा लागतो. म्हणजे तो मान्य संकेतातून वा रूढीतून संभवलेला असतो. म्हणून झाड किंवा सिंह हे संकेतांनी ठरलेले आहेत. त्यामुळेच झाड म्हणजे वेल नव्हे किंवा वाघ म्हणजे सिंह नव्हे. हा ही संकेतच होय. कारण वेल आणि वाघ यांना संकेतांनी वेगळे अर्थ लाभलेले आहेत.

### २. लक्षणा – (लक्ष्यार्थ)

एखाद्या वाक्याचा बोध होण्यासाठी कित्येक वेळा नुसत्या मुख्यार्थाचा किंवा वाच्यार्थाचा उपयोग होत नाही. त्यावेळी **मुख्यार्थ सोडून जो अर्थ आपण स्वीकारतो; तो लक्ष्यार्थ म्हणजे लक्षणाशक्ती होय.** उदा. 'घरावरून हत्ती गेला' असे आपण म्हणतो. परंतु 'घरावरून' या शब्दाचा मुख्यार्थ इथे उपयोगी पडत नाही. तेव्हा

त्याचा 'घराजवळून' असा अर्थ आपण घेतो; तोच 'लक्ष्यार्थ' होय. असा लक्ष्यार्थ ध्यानात येण्यासाठी नेहमीच दोन गोष्टींची आवश्यकता असते. **१.मुख्यार्थबोध –** म्हणजे मुख्यार्थ उपयोगास येत नाही हे लक्षात येते. उदा. घरावरून **२.मुख्यार्थाशी संबंध** – लक्ष्यार्थाचा मुख्यार्थाशी संबंध हा हवाच. उदा. घरावरून म्हणजे घराजवळून

लक्षणेचे दोन प्रकार आहेत. १) निरूढा लक्षणा २) प्रयोजनवती लक्षणा

### १) निरूढा लक्षणा

बोलण्याची रूढी असते; तेव्हा निरूढा लक्षणा होते. उदा. 'पानिपतावर हजारो बांगडी फुटली' या वाक्यात पानिपतच्या युद्धात अनेक सैनिक मारले गेलेए त्यामुळे स्त्रियांना वैधव्य प्राप्त झाले. बांगडी फुटणे याला प्राप्त झालेला रूढ अर्थ म्हणजे मृत्यू. हे निरूढा लक्षणेमुळे कळते.

### २) प्रयोजनवती लक्षणा

वाच्यार्थाला बाजूला सारून त्याच्याशी संलग्न असलेला दुसरा अर्थ स्वीकारायला काहीतरी कारण, हेतू, प्रयोजन असावे लागते, असे प्रयोजन असलेल्या लक्षणेला 'प्रयोजनवती लक्षणा' असे म्हणतात. हे प्रयोजन कधी स्पष्ट असते, तर कधी गूढ असते. जेव्हा प्रयोजन गूढ असते, तेव्हा लक्षणेत अधिक सौंदर्य जाणवते. उदा. घरावरून हत्ती गेला, घरामध्ये भेट इ.

## ३. व्यंजना – (व्यंग्यार्थ)

एरवीच्या व्यवहारात अभिधा वा लक्षणा या दोन शक्तींचा उपयोग पुरेसा होतो. पण, खऱ्या अर्थाने साहित्याचे साहित्यपण हे व्यंजनेत असते. साहित्यामध्ये प्रत्यक्ष वर्णनापेक्षा सूचकतेला जास्त महत्त्व असते आणि ही सूचकता व्यंजनेत असते. तेथे **वेगळयाच अर्थवलयांची, शक्तीची आवश्यकता असते. तिलाच व्यंजना (व्यंग्यार्थ) असे म्हणतात.** उदा. **बालकवींची 'औंदुबर' कविता.** या कवितेतील निसर्गदृश्य, त्यातील रेखीवपणा, रंगयोजना, झरा, त्याचे दोन्ही तीर, शेतमळयांची गर्दी, पायवाट, चार घरांचे चिमुकले गाव इ. तपशील आणि शेवटी जळात पाय टाकून बसलेला 'असला' ओंदुंबर हे सर्व अमिधा आणि लक्षणा या दोन शक्तींमुळे समजेल. पण असे समजण्याची प्रक्रिया म्हणजे आस्वादाची प्रक्रिया नव्हे. साहित्यकृतीतून व्यक्त होणारा एखादा अनुभव 'समजणे' वेगळे आणि त्याचा 'आस्वाद' घेणे वेगळे. आस्वादप्रक्रियेत तो अनुभव आत्मसात होत असतो, हे लक्षात ठेवले पाहिजे. ही प्रक्रिया अद्वैताचा, एकात्मतेचा अनुभव देणारी आहे. **औंदुबर फक्त झऱ्याकाठचा वृक्ष राहत नसून तो जीवनात येणाऱ्या सुखदु:खाच्या पलिकडे गेलेल्या स्थितप्रज्ञ वृत्तीचे प्रतीक बनतो. हे सारे शब्दात बसणाऱ्या व्यंजना नामक तिसऱ्या शक्तीमुळे घडते.**

**'सूर्य मावळला'** हे व्यंजनेचे प्रसिद्ध उदाहरण आहे. हे वाक्य कोणत्या व्यक्तीने उच्चारले याच्याावर त्याचा व्यंग्यार्थ अवलंबून आहे. हे वाक्य एखाद्या प्रियसीने उच्चारले असेल तर प्रियकराला भेटण्याची ओढ दिसते; तर एखाद्या चोराने उच्चारले असेल तर चोरी करण्याची वेळ झाली, हा अर्थ निर्माण होईल. तर एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीचे निधन झाले तर 'सूर्य मावळला' असे त्याच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन करताना म्हटले जाते. **अशी** किमया घडविणाऱ्या **शब्दशक्तीलाच्या** सामर्थ्यालाच **आनंदवर्धन हा संस्कृत मीमांसक 'ध्वनी' असे म्हणतो.**

**शाब्दी आणि आर्थी असे व्यंजनेचे दोन प्रकार सांगितले जातात.**

**१.शाब्दी व्यंजना** – शब्दांवर आधारित ती शाब्दी व्यंजना. श्लेष अलंकाराचे उदाहरण यामध्ये येते. **म्हणजे एका अर्थाने उच्चारलेला वाक्याचा जेव्हा दुसरा अर्थ श्रोत्याकडून केला जातो; त्यास श्लेष अलंकार म्हणतात.** उदा. पंडित रघुनाथ यांच्या **नलदमयंती स्वयंवर** या आख्यानकाव्यात दमयंती आजारी पढल्यावर आपल्या आईला म्हणते, **'औषध 'नल'गे मजला'.**

**२. आर्थी व्यंजना** – अर्थावर आधारित ती आर्थी व्यंजना. येथे दोन अर्थ्थ नाही तर काव्यपंक्ती विचारात घेतली जाते. उदा. भा.रा.तांबे यांची 'नववधु' ही कविता. 'नववधु प्रिया मी बावरते, लाजते, पुढे सरते, फिरते'. पतिगृही चाललेल्या नववधुच्या मन:स्थितीबरोबरच परमात्म्यात विलीन होणाऱ्या जीवात्म्याच्या दोलायमान भावस्थितीचे चित्र ही कविता वाचकांच्या मनात साकार करते. (जीव – शिव भेटीच्या वेळची जीवाची मन:स्थिती) दर्शनी अनुभवाबरोबरच सूचीत अनुभव साकार करण्याचे सामर्थ्य म्हणजेच अलौकिक ध्वनी होय.

........................................................................................................................

## अलंकारविचार –

प्रारंभी काळात अलंकार म्हणजे काव्यव्यापार असा व्यापक अर्थ होता. तेव्हा भामह, दण्डी, वामन या मीमांसकांना **'अलंकारिक'** आणि त्यांच्या ग्रंथांनाही **'अलंकार–ग्रंथ'** असे म्हटले जायचे. कारण काव्याचा विचार करताना या मीमांसकांनी अलंकारांना थोडे जास्त महत्त्व दिले. वामनाने तर **'काव्य ग्राह्य अलंकारात्'** (अलंकारामुळे काव्य स्वीकारणीय होते) असे म्हणून **'सौंदर्य अलंकार:'** (सौंदर्य म्हणजे अलंकार) अशी काव्यसौंदर्य आणि अलंकार यांना समानार्थक बनविणारी नवी व्याख्या केली होती. भरतमुनींनीही 'नाटयशास्त्र' या ग्रंथात अलंकार हा शब्द **नादसौंदर्य** अशा अर्थानेच वापरला. **नेपथ्यालंकार, पाठयालंकार, काव्यालंकार, प्रयोगालंकार अशा शब्दांची योजना त्यांनी नाटकाच्या त्या त्या अंगातील सौंदर्याच्या संदर्भात केली आहे.**

**भामहची वक्रोक्ती** (वक्रोक्ती म्हणले भाषेचा वाकडेपणा नसून ती काव्याची भाषा होय) किंवा **कुंतकाने तिचाच विदोग्धी** असा केलेला निर्देश हे दोन्हीही अलंकाराचे प्राणतत्त्वच होय. **शब्दार्थाचे रसाभिनय सामर्थ्य वाढविणे, त्यांना रसनिर्मितीक्षम बनविणे हेच अलंकाराचे कार्य होय.** म्हणूनच अलंकारामुळे काव्याची भाषाशास्त्र तत्त्वज्ञानातील भाषेहून भिन्न असते. कवी आपल्या कवितेतून शब्दार्थाची अशी काही मांडणी करतो; की त्यातून अपूर्व सोंदर्याचा अनुभव रसिकाला येतो. कवीलाच सुंदर स्त्रीमुखाबरोबर चंद्राची अनुभूती येऊन मुखचंद्रांसारखी शब्दनिर्मिती होऊ शकते. अलंकाराचे रहस्य या कविव्यापारात असते; किंबहुना अलंकारामुळे हे शक्य होते.

अलंकार संज्ञेचा हा व्यापक अर्थ नंतरच्या काळात लुप्त झाला आणि **कवितेची सजावट करण्याचे एक बाह्य साधन असाच अलंकाराचा विचार होऊ लागला.** उपमेय (मूळ वस्तू) आणि उपमान (संबधित दुसरी वस्तू) यांच्यातील साधर्म्य किंवा वैधर्म्य आणि चमत्कृती यांच्या आधारे अलंकाराचे साम्यमुलक आणि विरोधमुलक असे वर्गीकरण केले जाऊ लागले. **भरतमुनींनी प्रारंभी सांगितलेल्या चार अलंकारांचे १७ व्या शतकापर्यंत सव्वाशे अलंकार आले. 'रूय्यक' यांनी प्रथम शब्दालंकार व अर्थालंकार असे मुख्य भेद कल्पून ५ शब्दालंकार आणि ६९ अर्थालंकार असे एकूण ७४ अलंकार मानले.** त्याच्यामुळेच अलंकारविचारात काहीएक शिस्त आली आणि त्यानुसारच पुढील काळात अलंकाराची काही सर्वसाधारण सूत्रे सांगितली गेली; हे मान्य करायला हवे.

## प्रतिमा – (Image)

प्रतिमा म्हणजे चित्र, मूर्ती किंवा प्रतिबिंब. इंग्रजीत त्याला इमेज म्हणतात. भाषेच्या परिणामामुळे वाचकांच्या मनात निर्माण होणारी संवेदनाचित्रे महणजे प्रतिमा होय. प्रतिमा हा भाषा आणि साहित्य यामधील एक महत्त्वाचा घटक आहे. कवीच्या अनुभूतीला फुटलेला एक सहज, स्वाभाविक व नैसर्गिक आकार म्हणजे प्रतिमा असे सांगण्यात येते. अलंकाराच्या निर्मतीत थोडाफार तार्किकतेचा, कारागिरीचा अंश असतो. उपमेय आणि उपमान अशा द्वैताची जाणीव अलंकाराच्या मुळाशी असतेच असते. अगदी या दोघांचे ऐक्य सांगणाऱ्या रूपक अलंकारातसुद्धा ती जाणीव असते. अशी जाणीव प्रतिमेच्या निर्मितीत नसते. तर तेथे चैतन्य, सजीवत्व किंवा सेंद्रियत्व हे विशेष जाणवतात. प्रिस्कॉट, कोलरीज यांनी प्रतिमेची निर्मिती हे कल्पनाशक्तीचे मूलभूत कार्य आहे असे सांगितले आहे. **कोलरिजने 'जिच्या अंतरचनेत परस्पराविरूद्ध व असंगत गोष्टींमध्ये एक समतोल व सुसंवाद साधलेला असतो ती प्रतिमा'.** अशी प्रतिमेची व्याख्या केली आहे.

आपण जेव्हा एखादी वस्तू पाहतो जेव्हा आपल्याला तिचे इंद्रियगोचर स्वरूप जाणवते. परंतु जेव्हा ती वस्तु डोळयासमोर नसते; तेव्हाही तिच्या रंगरूपाचे चित्र मन:चक्षुंसमोर आणू शकतो. या चित्रालाच

**मनोविज्ञानामध्ये प्रतिमा म्हटले जाते.** आपल्याला ज्या पाच प्रकाराच्या इंद्रियसंवेदना होतात त्या प्रकारांवरून **प्रतिमांचे दृक, नाद, गंध, रस व स्पर्श असे पाच मुख्य प्रकार मानले जातात.** प्रतिमा ही संज्ञा समीक्षेत दोन अर्थांनी वापरली जाते. **१) भाषेच्या परिणामामुळे वाचकांच्या मनात निर्माण होणारी संवेदनाचित्रे म्हणजे प्रतिमा.** वस्तूचे तंतोतंत वर्णन करणारा शब्दसमुह त्या वस्तूचे वाचकाच्या मनात चित्र उमटवू शकतो. **२) काव्यात येणारे रूपक, उपमा यासारखे अलंकार म्हणजेही प्रतिमाच असतात.** परंतु येथे वाचकाच्या मनात उमटणाऱ्या संवेदनचित्राला महत्त्व नसून दोन वस्तू अगर घटना यातील साधर्म्य – वैधर्म्याला महत्त्व असते. आधुनिक अलंकारविचारात प्रतिमा ही संज्ञा कधी उपमानाला, कधी उपमेयाला तर कधी दोघांना मिळून वापरली जाते.

### प्रतीक – (Symbol)

प्रतीक म्हणजे चिन्ह. चिन्ह हे नेहमी कशाची तरी सूचना देत असते. कोणत्याही चिन्हाला सांकेतिक वापरामधून रूढ वा निश्चित असा एक अर्थ असतो. पाणी या शब्दामुळे पाणी या वस्तूचा बोध होतो तो रूढार्थामुळेच. मात्र रूढार्थ वा सांकेतिक अर्थ हा चिन्हांचा अंगभूत अर्थ नसतो. कारण पाणी या शब्दाला अथवा ध्वनींना कोणताही अंगभूत गुण नाही. पाणी या शब्दामधून पाणी या वस्तूपलिकडे जाऊन निसर्ग, जीवन, जिवंतपणा अशा अर्थाचा बोध होऊ लागला; की तो शब्द त्या अर्थाचे प्रतीक बनतो असे मानले जाते. इतिहासातील विशिष्ट घटनांमुळे किंवा संस्कृतीतील विशिष्ट संदर्भांमुळे काही चिन्हांचा प्रतिकात्मक अर्थ हाच सांकेतिक अर्थ बनलेला असतो. **उदा. क्रॉस हे खिस्ती धर्माचे प्रतीक तर तराजू हे न्यायाचे प्रतीक किंवा कुंकू हे हिंदू संस्कृतीमध्ये सौभाग्याचे प्रतीक इ.**

साहित्यामध्ये सांकेतिक अर्थापेक्षा वेगळा अर्थ सूचविणारा व्यापार चालत असल्याने प्रतीक या संकल्पनेला साहित्यव्यापारामध्ये विशेष महत्त्व आहे. उदा. पु.शि.रेगे यांच्या काव्यात येणाऱ्या निसर्गप्रतिमा या निसर्गाचे वर्णन करण्यासाठी व त्याच्याविषयी ज्ञान देण्यासाठी येत नसून मानवी जीवनाशी निसर्गाचा संबंध दर्शविणारी प्रतिके म्हणून येतात. **शेला, मेंदी यासारखी इंदिरा संतांच्या काव्यसंग्रहांची नावे उघडत प्रतीकात्मक आहेत. सुयोग्य प्रतिकांची निर्मिती हीसुद्धा कल्पनाशकतीमुळे होते.**

### प्राक्कथा – (Myth)

आपल्याकडील **पुराणकथा ही संज्ञा मिथ किंवा मिथक यांच्याशी मिळतीजुळती आहे**. मिथ या संकल्पनेसाठी प्राक्कथा, मिथ्यकथा, पुराणकथा, दैवकथा आणि दिव्यकथा या संज्ञाही रूढ आहे. प्राक्कथा म्हणजे ऐतिहासिक घटनांचे कथन करणारी गोष्ट होय. परंपरा, महत्त्वाची तत्त्वे, धर्म यासारख्या महत्त्वाच्या संकल्पना

कशा उद्भवल्या ते त्याद्वारे विशद केले जाते. फ्राईड, युंग, फ्रेझर या मानसशास्त्रज्ञांनी जाणीव, (कॉन्शन्स) अर्धजाणीव व नेणीव (अनकॉन्शन्स) असे तीन स्तर कल्पिले आणि साहित्याचा संबंध नेणिवेतील हालचालींशी जोडून दिला.

प्रत्येक समाजाला एक खास संस्कृती व ऐतिहासिक परंपरा असते. या परंपरेतून काही स्मृतिरूप अवशेष सर्व समाजमनाच्या नेणिवेच्या स्तरावर रेंगाळत असतात. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हा अनुभवाचा साठा चालत आलेला असतो. एक पिढी त्या कथा दुसऱ्या पिढीकडे स्वाधीन करते. **त्याद्वारा मिळणाऱ्या प्रतिमांमधून त्या त्या समाजाने अर्थ शोधायचा असतो. आपल्या पुरातन ग्रंथांतून अशा प्राक्कथांची निर्मिती झालेली दिसते. उदा. विष्णूचे दहा अवतार, चातुर्वर्ण्यव्यवस्था, तळी उचलणे, बळीप्रतिपदा** यांच्यासह रामायणातील सीता, हनुमान यांचा जन्मकथा याही परंपरेने मानवसमूहाच्या मनातील नेणिवेच्या स्तरावर जपलेल्या स्मृतीच्या प्राक्कथांची रूपेच होत. शंकराचे तांडवनृत्य ही एक प्राक्कथा रूपच होय. हे सारे कथारूप पावलेले समाजाच्या सामूहिक मनाच्या अनुभवांचे साठेच होत. म्हणून प्राक्कथांनी युक्त अशा कलाकृती समाजाच्या जीवनविषयक दृष्टिकोनाला निर्दोषपूर्णता मिळवून देतात. कारण युगानुयुगे मानव जे जीवन जगत आला, त्याचे सारे सार म्हणजे सामूहिक नेणिवेकडून पुरविली जाणारी ही शिदोरी आहे; असा युंगचा दावा आहे. तेव्हा काव्य किंवा ललितसाहित्य हा नेहमीच असा एक व्यापक अनुभव देत असते तो अतिशय महत्त्वाचा असतो आणि अशी व्यापकता शब्दार्थाच्या व्यंजना नामक वक्रव्यापारामुळे लाभत असते. यामुळेच या वक्रव्यापाराला भारतीय वा पाश्चात्य साहित्यविश्वात महत्त्वाचे स्थान लाभलेले आहे.

......................................................................................................................

## शैलीविचार म्हणजे काय ? – Style / Stylistics

शैली ही संज्ञा आविष्कारपद्धतीशी समानार्थक मानली जाते. त्यामुळे **'आविष्काराची रीत, पद्धत, लकब, धाटणी, तंत्र म्हणजे शैली' असा अर्थ रूढ झालेला दिसतो.** यामुळेच वेगवेगळया लेखकांची शैली, **मध्ययुगीन शैली, आधुनिक शैली, शाहिरी शैली, रोमॅंटिक शैली, वास्तववादी शैली, जुनी वा आधुनिक शैली** असे शब्दप्रयोग केले जाताना दिसतात.

भारतीय साहित्यशास्त्रात शैलीची संकल्पना नवव्या शतकात होऊन गेलेल्या **वामन** या मीमांसकाच्या रीतिविचाराशी जोडली जाते. **'रीतिःआत्मा काव्यस्य । विशिष्ट पदरचना रीतिः। विशेषो गुणात्मा'** या वामनाच्या शैलीसूत्राचा अर्थ रीती हा काव्याचा आत्मा आहे, विशिष्ट स्वरूपाची पदांची रचना म्हणजे रीती आणि पदरचनेचे वैशिष्टय म्हणजे गुणात्मकता असा आहे. साहित्यकृतीचे रसग्रहण करताना 'काय सांगितले आहे' आणि 'कसे सांगितले आहे' या दोन दृष्टींनी अनेकदा विचार केला जातो. **वामनाचा रीतिविचार** हा 'कसे सांगितले आहे' म्हणजे काव्याच्या बाह्यांगाचाच विचार आहे असे रा. श्री. जोग यांच्यासारख्या अभ्यासकांना वाटते. जर स. रा. गाडगीळ, गं. त्र्यं. देशपांडे यांनी वामनाचा रीतिविचार हा फक्त काव्याच्या बाह्यांगाचा विचार नसून 'विशेषो

गुणात्मा' हे त्याचे सूत्र महत्त्वाचे असून त्यात शब्दार्थाच्या (प्रसाद, माधूर्य इ.) गुणवैशिष्टयांवर आधारलेला आहे. अशा गुणांनी युक्त असलेल्या पदरचनेच्या ठिकाणीच सौंदर्याचा साक्षात्कार होऊ शकतो असे वामनाला म्हणायचे आहे असे सांगितले. परंतु कालांतराने वामनाच्या भूमिकेतील व्यापकतेचा विचार बाजूला पडून **'विशिष्ट रसाला उपकारक अशी पदरचना'** एवढाच रीती या शब्दाला मर्यादित अर्थ उरला. अर्थात असे असले तरी गुणांना प्राधान्य देणाऱ्या वामनाच्या मूळ रीतिविचारात आशय व अभिव्यक्ती यांचा एकत्र विचार केला गेलेला होता, हे लक्षात ठेवले पाहिजे.

इ.स.१७५३ साली **ब्यूफॉं** या फ्रेंच समीक्षकाने '**Style is the man himself**' (शैली म्हणजे खुद्द लेखकच) अशी शैलीची व्याख्या केली. तेथूनच शैलीबाबत एक नवा विचार सुरू झाला. ब्यूफॉंने शैलीविचारात **'लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार'** समाविष्ट केला. **गुस्तॉव फ्लोबे** या या फ्रेंच लेखकाने '**Style is the writer's own way of thinking and seeing**' (शैली म्हणजे लेखकाची विचार करण्याची व अवलोकन`रण्याची खास पद्धत) असे म्हटले. **सॉक्रेटिस** या प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्त्याचेही '**As a man is, so is his speech**' (जसा माणूस तसा त्याचा मौखिक आविष्कार) असे एक वचन आहे. 'उदात्त वा थोर व्यक्तिमत्त्वाचा पडसाद म्हणजे शैलीची उच्चतरता' असे **लॉंजिनसने** म्हटलेले आहे. तर **गिबनने** 'शैली म्हणजे व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब' असे म्हटले आहे. तेव्हा शैलीत लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होत असतो हे सूत्र जवळजवळ सर्वांना प्रारंभापासून जाणवल्याचे आणि त्यांनी ते मान्य केल्याचे दिसते.

शैलीसंबंधी स्वतंत्र ग्रंथ लिहिणाऱ्या **मिडलटन मरे** या समीक्षकाने **Style** या संज्ञेचे तीन अर्थ दिले आहेत. **१. लेखकाच्या विशिष्ट लकबी २. आविष्काराचे तंत्र ३. कलावंताच्या व्यक्तिगत अनुभवांतून येणारा अपूर्व असा विश्वात्मक अनुभूतींचा आविष्कार.** यातील पहिले दोन अर्थ बाह्यांगाशी संबंधित असून तिसरा अर्थ योग्य तऱ्हेने शैली या संज्ञेचा व्यापक अर्थ स्पष्ट करतो. लेखकाची अनुभव घेण्याची व कलेच्या पातळीवर त्यास शब्दरूप देण्याची जी पद्धती असते ती येथे ध्यानात घेतली गेली आहे. ती प्रत्येक लेखकाच्या संदर्भात वेगळी असते म्हणून प्रत्येक लेखकाची शैली वेगळी असे आपण म्हणतो.

## शैलीविचार –

### १.लेखक तशी शैली –

ही लेखकाची वैयक्तिक शैली असते. लेखकाच्याद्वारा लेखनातून स्वत: लेखकच प्रकट होत असतो आणि त्याचे आत्मप्रगटीकरण पूर्णपणे स्वतंत्र असते. ही प्रक्रिया लक्षात घेऊनच 'लेखक तशी शैली' ही

संकल्पना मांडली जाते. एखादा नेमका विषय घेऊन अनेक लेखकांनी निर्माण केलेल्या लेखनकृती यामुळे वेगळया झालेल्या दिसतात. **उदा. पुणे शहरात जुन्या काळी रात्रीच्या वेळी सारंगी वाजवीत फिरणारा कुणी एक सारंगीवाला आला होता. ते केंद्र कल्पून माधव ज्यूलियन, कवी यशवंत आणि गिरीश यांनी लिहिलेल्या कविता** किंवा 'क्लिओपात्रा' या प्राचीन इजिप्तच्या सम्राज्ञीचे केंद्र कल्पून ड्रायडन, शेक्सपिअर आणि जार्ज बर्नाड शॉ या तीन नाटककारांनी 'ऑल फॉर लव्ह, अँथनी अॅण्ड क्लिओपात्रा आणि सीझर अॅण्ड क्लिओपात्रा' ही अनुक्रमे लिहिलेली तीन नाटकांचा विचार करीता यापैकी प्रत्येक साहित्यकृती स्वतंत्र शैलीची आहे असे दिसते. याचे कारण विषय एकच असला तरी लेखक वेगळा आहे हेच होय. क्रेंद्रीभूत अनुभवांचा आराखडा एक असला तरी त्यातील घटकांची मांडणी स्वतंत्र व वेगळी आहे. कारण अशी फेरमांडणी स्वतंत्रपणे करणारी वेगवेगळी लेखक मने व त्या मनांचा स्वतंत्र व वेगळा दृष्टिकोन हेच होय.

विषय एकच असला तरी लेखक वेगळे असल्यामुळे आशय बदलतो, अभिव्यक्ती बदलते परिणामी शैलीही बदलते. अशा प्रकारे वरील विवेचनानुसार 'जसा लेखक तशी शैली' असे म्हणता येईल. ब्यूफॉने ही '**Style is the man himself**' (शैली म्हणजे खुद्द लेखकच) असे सूचीत केले आहे. त्यामुळे 'लेखक तशी शैली' हे विधान योग्यच आहे.

## २. साहित्यप्रकार तशी शैली –

शैलीच्या बाबतीत कलावंताचं मन आणि त्याचा कलाव्यापार हे केंद्रस्थानी असल्यामुळे साहित्यप्रकार आणि शैली यांच्यातील संबंध एका मर्यादेपर्यंत मानावा लागतो. साहित्यप्रकार आणि शैली यांच्यातील संबंध पाहताना थोडया फार वरवरच्या दृष्टिकोनाचा अवलंब करावा लागतो. **उदा. नाटककार वि.वा.शिरवाडकर यांची संवादशैली काव्यात्मक आहे. किंवा कवी कुसुमाग्रज यांच्या काव्यशैलीमध्ये नाटयाचा सतत अढळ होतो असे म्हटले जाते. तेव्हा त्यात हवाबंद कप्पे नसतात.** साहित्याचे गद्य आणि पद्य असे प्रथमदर्शनी जानवणारे प्रकार उघड उघड दोन शैलीचे दर्शन घडवितात. काव्यातही विशुद्ध भावकाव्य, खंडकाव्य, सुनीत, हायकू, उद्देशिका, नाटयकाव्य, महाकाव्य असे जे प्रकार दिसतात तेथेही शैलीचे बदल अपेक्षित असतात. भावकाव्यातील नेमकेपणा, अल्पाक्षरत्व, उत्स्फूर्तभाव असे शैलीविशेष अर्थातच खंडकाव्य किंवा महाकाव्य यांच्यासंदर्भात अपेक्षिता येत नाही.

ललित गद्य साहित्याच्या बाबतीतही त्यांचा भाषिक अवकाश लक्षात घेता शैलीतील बदल आवश्यक ठरतात. तसेच कादंबरी व नाटक यांच्या लेखनशैलीबद्दलही सांगता येईल. कादंबरी श्राव्य गटात तर नाटक

दृकश्राव्य गटात मोडते. तसेच नाटकाची प्रयोगक्षमता लक्षात घेतली तर त्याची शैली कृती—उक्तीच्या दृश्य संघटनेत शोधावी लागते. मराठीमध्ये अनेक कादंबऱ्यांचे नाटय रूपांतर झालेले दिसते. **उदा. श्री. ना. पेंडसे यांची 'गारंबीचा बापू', गो. नी. दांडेकरांची 'शितू' इ. या ठिकाणी या कादंबऱ्यांची नाटयरूपांतरे स्वतः लेखकानेच केलेली असूनही शैलीत बदल झालेला दिसून येतो. म्हणजे स्वतः लेखकानेच दोन वाङमयप्रकार हाताळले तरी त्यांच्या शैलीत बदल होतो.** त्याचप्रमाणे जयवंत दळवी यांच्या 'महानंदा' या कादंबरीचे शं. ना. नवरे यांनी 'गुंतताहृदय' असे जे नाटयरूपांतर केले त्यातही निश्चित बदल आढळतो. तेव्हा साहित्यप्रकार एका मर्यादेपर्यंत शैलीनियम करीत असतात हे खरेच आहे. या मर्यादेपर्यंत यासाठी म्हणायचे की साहित्यनिर्मिती आणि साहित्यप्रकार यांचा निर्मितीप्रक्रियेतील संबंध नेमकेपणाने निश्चित होऊ शकत नाही.

### ३. आशय तशी शैली —

आशय आणि अभिव्यकती यातील अद्वैत एकदा मान्य केले की या संकल्पनेचा अर्थही ध्यानात येऊ लागतो. **एखाद्या आशयाकडे पाहण्याचा लेखकाचा दृष्टिकोन वेगवेगळा असल्याने त्याचा आविष्कारही वेगळा ठरतो. उदा. मनुष्य स्वभावात दडलेले संशयाचे एक सूत्र ध्यानात घेतले तर त्या संदर्भात शेक्सपिअरला सापडलेले भावसत्य आणि गो.ब.देवलांना सापडलेले भावसत्य भिन्न आहे असे त्यांच्या अनुक्रमे ऑथेल्लो' आणि 'संगीत संशयकल्लोळ' या नाटयकृतींवरून दिसून येते. संशयाच्या सूत्राची शेक्सपीअरने 'गंभीर' दखल घेतलेली दिसते तर देवलांनी 'हलकीफुलकी' दखल घेतलेली दिसते. त्यामुळेच 'ऑथेल्लो' शोकांतिका तर 'संशयकल्लोळ' ही सुखांतिका झालेली दिसते व त्यानुसारच नाटयशैलीही वेगळी झालेली दिसते.**

**'जसा आशय तशी अभिव्यक्ती'** या सूत्रानुसार प्रत्येक वेळी स्वतंत्र शैली संभवते. त्यामुळेच एखाद्या लेखकाच्या भिन्न कलाकृतीमंध्ये भिन्न शैलींचे दर्शन घडते. उदा. वसंत कानेटकर यांचे 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे ऐतिहासिक नाटक तर 'प्रेमा तुझा रंग कसा' हे हलकेफुलके नाटक इ. त्याचे कारण त्या त्या ठिकाणचे आशयाचे स्वरूप वेगळे आहे असे म्हणता येईल. आशयातील बदलामुळे जसे कलाकृतीचे रूप बदलते तशी शैलीही बदलते असे म्हणणे योग्य होईल. उदा. आशय (दलित, ग्रामीण, स्त्रीवादी), ठिकाण, जातिगट इ.

..............................................................................................................................